तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित,--------------------------

पोटनियम

तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित:-

पोटनियम:

१.० नाव, पत्ता व कार्यक्षेत्र:-------------------------------------------------------------

१.१ हया संघाचे नाव:- ---- तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या. ---- असे असून यापुढे संघ या नावाने संबोधिल जाईल.

१.२ हया संघाचा नोंदलेला पत्ता: ------------- असा राहील. हया पत्त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास तो संबंधित नोंदणी (अधिका-याला) व इतर संबंधितांना तीस दिवसाचे आत कळविला जाईल.

१.३ हया संघाचे कार्यक्षेत्र: -------------------- असे राहील.

## 2. व्याख्या:

**२.१ संघ :** हयाचा अर्थ --------- तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, --------.

**2.2 " समिती " जिच्याकडे संस्थेच्या कारभाराचे व्यवस्थापन सोपविण्यात आले असेल अशी त्या सहकारी संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा संचालक मंडळ किंवा नियामक मंडळ किंवा अन्य निदेशन निकाय मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो.**

**2.3 " पदाधिकारी " म्हणजे कार्याध्यक्ष, उपकार्याध्यक्ष, अध्यक्ष, उपाध्यक्ष, व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापक, सचिव, कोषापाल, समितीचा सदस्य आणि अशा संस्थेच्या कामकाजासंबंधी निदेश देण्यासाठी या अधिनियमान्वये नियमांन्वये किंवा उपविधीन्वये निवडून दिलेली किंवा नेमणुक केलेली इतर कोणतीही व्यक्ती, मग ती कोणत्याही नावाने संबोधण्यात येणे, या सारखा कोणताही पदाधिकारी.**

**2.4 " तज्ञ संचालक " याचा अर्थ, बँकिंग, व्यवस्थापन, वित्त व्यवस्था या क्षेत्रामधील अनुभव असलेली व्यक्ती, असा आहे. आणि त्यामध्ये संबधित संस्थेने हाती घेतलेली उदिष्टे व कार्ये यांच्याशी संबधित अन्य कोणत्याही क्षेत्रातील विशेषज्ञता धारण करणा-या व्यक्तीचा समावेश होतो.**

२.५ " **सेवक** " संस्थेचे कामकाज पार पाडण्यासाठी नेमलेली पगारी व्यक्ती

**2.6 " कार्यलक्षी संचालक " याचा अर्थ, व्यवस्थापन संचालक किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येणे, असा आहे. आणि त्यामध्ये, समितीने नामनिर्देशित केलेल्या संबधित संस्थेच्या कोणत्याही विभागाच्या प्रमुखाचा समावेश होतो.**

**2.7 " प्राधिकृत व्यक्ती " याचा अर्थ, अनुच्छेद 243 यथ मध्ये विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती असा आहे. आणि त्यामध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कार्यवाही करण्यासाठी निबंधकाने यथोचितरित्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो.**

**2.8 " क्रियाशिल सदस्य " याचा अर्थ जो संस्थेच्या कारभारात भाग घेतो आणि उपविधीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा संस्थेच्या सेवांचा किंवा साधनांचा किमान मर्यादेत वापर करतो असा सदस्य, असा आहे.**

२.९ **" संघीय संस्था " म्हणजे जिल्हा** सहकारी दूध संघ मर्या.

2.10 " **वित्तीय संस्था** " म्हणजे भारतीय रिझर्व बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अधीन असलेली व भारतीय रिझर्व बँकेने विनियमित केलेल्या अशा वित्त संस्थेकडून कर्ज घेईल अशी संस्था

**2.11 " राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण " याचा अर्थ, राज्य शासनाने कलम 73 गख अन्वये घटित केलेले प्राधिकरण, असा आहे.**

२.१२ **मालजिनसा:** हयामध्ये दूध, दुग्धजन्य पदार्थ, पशुआहार, पशुआहारास लागणारा कच्चा किंवा तयार कृषि उत्पादित माल, दूध व दुग्धजन्य पदार्थांचे संकलन, प्रक्रिया, उत्पादन व साठवणूक करण्यासाठी आवश्यक असणारे साहित्य, यंत्रसामुग्री संवेष्टित (पॅकेजिंग मटेरियल) इत्यादींचा समावेश आहे.

२.१३ **अधिमंडळाची वार्षिक बैठक:** हयामध्ये **अधिमंडळाची वार्षिक बैठक** व विशेष सर्वसाधारण सभांचा समावेश आहे.

२.१४ **चेअरमन:** हयाचा अर्थ हया पोटनियम 17 अन्वये अस्तित्वात आलेले चेअरमन

२.१५ **कार्यलक्ष्यी संचालक:** हयाचा अर्थ पोटनियम 18 अन्वये नियुक्त केलेले कार्यकारी संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकीय संचालक/व्यवस्थापक

२.१६ **सभासद:** हयाचा अर्थ पोटनियम 5 अन्वये समावेश केलेले सभासद.

२.१७ **कायदा:** हयाचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा/अधिनियम 1960.

२.१८ **नियम:** हयाचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961.

२.१९ **निबंधक:** हयाचा अर्थ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 2(24) यात दिलेल्या व्याख्येनुसार सदर कायदयाखाली नेमण्यात आलेले निबंधक, सहकारी संस्था.

२.२० **महासंघ:** हयाचा अर्थ महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित.

## 3.0 उद्देश:

3.1 दूध उत्पादकांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी तसेच दूध व्यवसाय वाढीच्या दृष्टीने पूरक अशा योजना कार्यान्वित करुन माल जिनसाचे आधुनिक पध्दतीने उत्पादन, साठवणूक, प्रक्रिया करणे, विक्रीची व्यवस्था करणे. कार्यक्षेत्रात उत्पादन केलेल्या दूधास वर्षभरात किफायतशीर आणि खात्रीलायक बाजारपेठ

मिळवून देण्याची व्यवस्था करणे तसेच संस्थांच्या सभासदांना या बाबतीत मार्गदर्शन करणे हे संघाचे उद्देश राहतील.

**3.2 वरील उद्देश पूर्तीसाठी संघाचे कार्य खालीलप्रमाणे राहील.**

3.2.1 सभासदांच्या हितास बाधा येणार नाही अशा रितीने सभासद व इतरांकडून मालजिनसा खरेदी करणे, एकत्रित करणे, पदार्थ तयार करणे व त्यांची विक्री आणि वितरण व्यवस्था करणे.

3.2.2 स्वत: ची किंवा भाडेपट्टीने किंवा इतर मार्गाने स्थावर व जंगम मालमत्ता धारण करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे.

3.2.3 इमारती, यंत्रसामुग्री, प्रकल्प (प्लॅन्टस) आणि/किंवा सहाय्यभूत उपकरणे खरेदी करणे आणि किंवा उभारणे.

3.2.4 नवीन प्राथमिक सहकारी दुग्ध संस्था संघटित करणे, कार्यक्षेत्रातील संस्थांच्या कामकाजात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने संघ त्यांना सल्ला, मार्गदर्शन व मदत करेल. त्यांच्या कामकाजातील दोष सुधारण्याच्या दृष्टीने नियंत्रण ठेवील. संघाची संस्थेवर प्रशासक म्हणून नेमणूक झाल्यास संघ अशा संस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेईल.

3.2.5 संलग्न संस्थांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याची व्यवस्था करणे व त्यासाठी सर्वसाधारण सभेच्या पूर्व परवानगीने देखरेख शुल्क ठरवून वसूल करणे.

3.2.6 दूध उत्पादन, पशुखाद्य उत्पादन व वैरण विकास करणे आणि/किंवा तत्सम बाबींस प्रोत्साहन देणे.

3.2.7 दूध उत्पादन वाढीसाठी व प्रतिबंधक उपाययोजना करण्यासाठी पशुवैद्यकीय मदत व कृत्रिम गर्भधारणेच्या सोई व इतर तांत्रिक सहाय्य करुन देणे.

3.2.8 उत्तम पैदाशीच्या हेतूने जनावरे बाळगणे.

3.2.9 आवश्यक असल्यास जनावरांच्या खरेदी विक्रीचा व्यवहार अंगिकारणे.

3.2.10 आवश्यकतेनुसार संघाच्या स्थावर व जंगम मालमत्तेचा विमा उतरविणे व एजन्सी तत्त्वावर सभासदांच्या जनावरांचे विमे उतरविणे.

3.2.11 सभासदांच्या समान हितसंबंध असलेल्या अडीअडचणी सोडविणे.

3.2.12 सहकारी तत्त्वांचा प्रसारण करणे व सभासदामध्ये सहकाराची भावना वृध्दींगत करुन तिचा व्यवस्थापनात उपयोग करणे.

3.2.13 संघाच्या उद्देश पूर्तीसाठी सभासद व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

3.2.14 सभासद कर्मचा-यांच्या हितासाठी विश्वस्त निधी उभा करणे व अशा निधीस साहाय्य करणे.

3.2.15 दुग्ध व्यवसायाशी संबंधित संशोधन व विकास प्रतिष्ठानाची स्वतंत्र स्थापना करुन निधी उभारणे व निधीस सहाय्य करणे.

3.2.16 बचत योजना आखून त्या कार्यान्वित करण्यास प्रोत्साहन देणे.

3.2.17 मालजिनसांच्या वाहतुकीची व्यवस्था करणे.

3.2.18 दुभत्या जनावरांच्या पैदाशीसाठी व त्यांच्या संवर्धनासाठी संलग्न संस्थांना व दूध उत्पादकांना अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन देण्यास मदत करणे.

3.2.19 संघाच्या व संघात असलेल्या संलग्न संस्थांच्या गरजा भागविण्याकरिता पोटनियमामध्ये नमूद केलेल्या साधनांनी (मार्गानी) भांडवल जमविणे, अर्थसहाय्य करणा-या कोणत्याही संस्थेकडून संघाच्या उद्देशपूर्तीसाठी कर्ज व अनुदानाच्या रुपाने आर्थिक मदत स्वीकारणे.

3.2.20 संलग्न सोसायटयांच्या सभासदांना उत्तम जातीची जनावरे मिळवून देण्याकरिता मदत करणे.

3.2.21 संघाचे व्यवस्थापनासाठी जिल्हयात एक अगर अनेक कचे-या उघडणे.

3.2.22 कर्मचा-यांसाठी घरबांधणी योजना अंगिकारणे.

3.2.23 सहकारी दूध संस्थांना आवश्यक ते तांत्रिक, आर्थिक, प्रशासकीय व तत्सम साहाय्य करणे.

3.2.24 वरील उद्देशांना धरुन व त्यांचे पूर्ततेसाठी सर्वसाधारणपणे आवश्यक अशी सर्व कामे करणे.

## 4.0 निधी:

४.१ निधी खालील मार्गाने उभारण्यात येतील.

४.१.१ प्रवेश फी

४.१.२ भाग (शेअर्स)

४.१.३ सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी स्वीकारणे.

4.1.4 कर्जे

४.१.५ अनुदान मदत व सवलतीद्वारे.

४.१.६ शेअर वर्गणी

४.२ संघाचे अधिकृत भाग भांडवल ------ रुपये राहील. एकूण ----- समान भाग प्रत्येकी शंभर रुपये दर्शनी किंमतीचे विक्रीस काढले जातील. भाग विकत घेताना दर्शनी किंमती प्रमाणे भागाच्या प्रमाणात रक्कम पूर्णत: भरावी लागेल. सभासदाची जबाबदारी त्यांनी धारण केलेल्या भागाच्या किंमतीएवढी मर्यादित राहील.

४.३ नियम क्र. 35 अनुसार संस्थेची दायित्वे (liability) ही जमविलेली एकुण रक्कम, वसूल झालेले भाग भांडवल, साठवलेली गंगाजळी व इमारत फंड यातून साचलेला तोटा वजा जाता राहिलेल्या रक्कमेच्या 10 पटीहून जास्त, निबंधकाच्या पूर्व परवानगीशिवांय असणार नाही.

४.४ संघाच्या निधीची गुंतवणूक सहकारी कायदा कलम 70 अन्वये करण्यात येईल.

## ५.० सभासदत्व :

कार्यक्षेत्रातील नोंदणी झालेल्या प्राथमिक सहकारी दूध संस्था, संघाचे सभासदत्व धारण करतील त्या सभासदाचे प्रकार खालील प्रमाणे.

अ) क्रियाशिल सभासद ब) अक्रियाशिल सभासद क) सहयोगी, नाममात्र सभासद

**5.1 अ) क्रियाशिल सभासद:- क्रियाशिल सभासद म्हणजे अशी सभासद संस्था जी संघाला मागील सलग 5 वर्षात दरवर्षी किमान 180 दिवस प्रतिदिन किमान 200 लिटर दूधाचा पुरवठा करेल आणि मागील सलग पाच वर्षात किमान एकदा अधिमंडळाची बैठकीस सभासद संस्थेचा प्रतिनिधी हजर असणे आवश्यक आहे.**

**केवळ क्रियाशिल सभासदालाच निवडणूकीत मतदानाचा अधिकार राहील. त्याच प्रमाणे क्रियाशिल सभासदाची नोंद वही प्रतिवर्षी तयार करणे आवश्यक राहील. जो सभासद वरिल अटीची पूर्तता करित नसेल अशा सभासदांचे वर्गीकरण अक्रियाशिल सभासद म्हणून करण्यात येईल.**

**5.1 ब) अक्रियाशिल सभासद:- जो सदस्य वरीलप्रमाणे मागील सलग पाच वर्षाच्या कालावधीत अधिमंडळाच्या किमान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही आणि संस्थेच्या उपविधींमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, दूधाचा पुरवठा करणार नाहीत अशा कोणत्याही सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात येईल.**

१. **परंतु आणखी असे की, जेव्हा संस्था एखाद्या सदस्याचे अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण करील तेव्हा, ती संस्था, वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, संबंधित सदस्याला अशा वर्गीकरणाबाबत विहित रीतीने कळवील.**
२. **परंतु असेही की, जो अक्रियाशील सदस्य असे त्याचे वर्गीकरण केल्याच्या दिनांकापासून पुढील पाच वर्षामध्ये किमान दूध पुरवठा करणार नाही व सर्व सदस्य मंडळाच्या निदान एका बैठकीला उपस्थित राहणार नाही असा कोणताही अक्रियाशील सदस्य कलम 35 अन्वये त्याला काढून टाकले जाण्यास पात्र ठरेल.**

**३. परंतु असेही की, अक्रियाशील सदस्य म्हणून वर्गीकरण केलेल्या सदस्याने, उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पात्रता निकषांची पूर्तता केल्यावर, तो क्रियाशील सदस्य म्हणून त्याने पुन:वर्गीकरण केले जाण्यास हक्कदार होईल.**

**४. परंतु असेही की, एखादा सदस्य क्रियाशील किंवा अक्रियाशील सदस्य असण्याबाबत वाद उदभवल्यास, असे वर्गीकरण केल्याचे कळविल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीच्या आत निबंधकाकडे त्याबाबत अपील करण्यात येईल.**

**५. परंतु असे ही की, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, 2013 याच्या प्रारंभाच्या लगतनंतर घेण्यात येणा-या कोणत्याही निवडणुकीत, त्या संस्थेचे सर्व विद्यमान सदस्य, त्यांना मतदान करण्यासाठी अन्यथा अपात्र घोषित केले नसेल तर, मतदान करण्यासाठी पात्र ठरतील.**

5.1 "नाममात्र सदस्य " अगर " सहयोगी सभासद " म्हणून एखाद्या व्यक्तीस त्याचे लेखी अर्जावरुन अधिनियम कलम क्रमांक 5 मधील तरतुदीनुसार सदस्य करुन घेता येईल, अशा सदस्यांचे संस्थेशी होणारे व्यवहार व संस्थेतील त्याचे अधिकार मर्यादित स्वरुपाचे असतील.

5.2 संघाशी व्यवहार करणारे विक्रेते, त्यांची हमी देणारे आणि संघाचा ज्यांच्याशी आर्थिक संबंध येत आहे अशा संस्था व व्यक्ती, नाममात्र सभासदांना भाग धारण करावे लागणार नाही. परंतु ज्यांचा व्यवहार एक लाखा पर्यन्त आहे त्यांना प्रत्येकी फी **रु. 251, व्यवहार एक लाख ते पाच लाख रुपये 500, व्यवहार पाच लाख ते दहा लाख रु.750, व्यवहार दहा लाखावर रुपये 1000/-** भरावे लागेल. त्यांना मत देण्याचे व संघाच्या व्यवस्थापनात भाग घेण्याचे व संघाच्या नफयात हिस्सा घेण्याचे अधिकार राहणार नाहीत. अशा सभासदाचे नाममात्र सभासदत्व त्यांचा संघाशी आर्थिक संबंध असेपर्यंत राहील. तसेच संघ अवसायनात घेण्यात आला तर नाममात्र सभासदावर कसल्याही प्रकाराणे दायित्व राहणार नाही.

5.3 संघाचे सभासदत्वासाठी अर्ज केलेल्या नियोजित संस्था तसेच सभासद नसलेल्या प्राथमिक सहकारी दूध संस्थांना तीन महिन्याच्या मुदतीसाठी नाममात्र सभासद करुन घेतले जाईल.

**५.४ सभासद होण्यासाठी खालील अटी पूर्ण कराव्या लागतील.**

५.४.१ प्रवेश फी **रु.501/-** दिली पाहिजे.

५.४.२ किमान एक भाग धारण केले पाहिजेत. प्रत्येक भाग हा रु 100/- राहील.

५.४.३ सभासद होण्यापूर्वी संस्थेने संघास तीन महिन्यापर्यंत प्रतिदिन किमान 50 (पन्नास) लिटर्स दूध पुरवठा केला पाहिजे. तद्नंतर सभासद राहण्यासाठी 180 दिवस प्रतिदिन 50 लि. दूध पुरवठा केला पाहिजे.

५.४.४ संघाने तयार केलेल्या नमुन्यात करारनामा करुन दिला पाहिजे.

५.५ संघाचे नोंदणीचे वेळी प्रवर्तक म्हणून नोंदणी प्रकरणावर सहया करणा-या सहकारी दुग्ध संस्थांना संघाचे सामान्य सभासदत्व आपोआप प्राप्त झाले आहे असे गृहित धरण्यात येईल.

५.६ संघाचे संचालक मंडळ वेळोवेळी ठरविल त्या प्रमाणात भाग भांडवल आणि/किंवा ऋणपत्रे सामान्य सभासदांकडून त्यांनी संघाशी केलेल्या व्यवहाराचे प्रमाणात उभारण्याचा अधिकार संघास राहील.

५.७ भाग भांडवल आणि/किंवा ऋणपत्रे 6 महिन्याचे वर भरण्याचे राहिल्यास अशा सभासदाविरुध्द संचालक मंडळास योग्य ती कारवाई करता येईल.

५.८ एकाच तारखेस विकत घेतलेल्या प्रत्येक भागांबद्दल निराळा क्रमांक असलेले भाग प्रमाणपत्र दिले जाईल. अथवा एकापेक्षा जास्त भाग घेतले असल्यास त्या सर्व भागांबद्दल निरनिराळे क्रमांक देऊन भागाचे एकत्रित एकच प्रमाणपत्र दिले जाईल.

५.९ सभासदांकडून गहाळ झालेल्या एक किंवा अनेक भाग प्रमाणपत्राकरिता दुसरी प्रत (डुप्लिकेट) भाग प्रमाणपत्र दिले जाईल. मात्र याकरिता संचालक मंडळाची मंजूरी हवी व प्रत्येक भाग प्रमाणपत्राकरिता 10 रुपये फी सभासदाने द्यावयास हवी. सभासदाला या करीता इन्डीमिनीटी बॉन्ड द्यावा लागेल व नवीन भाग प्रमाणपत्रात तसे लिहिले जाईल.

## 6 दायित्व:

६.४ सामान्य सभासदाचे दायित्व त्याने धारण केलेल्या भागाच्या किंमतीपेक्षा अधिक असणार नाही.

## 7.सभासदत्व कमी करणे.

सामान्य सभासदास सहकारी कायद्यातील तरतुदीस अनुसरुन, सर्वसाधारण सभेस हजर असलेल्या आणि मतदान करणा-या सभासदांच्या 3/4 बहुमताने खालील कारणास्तव काढून टाकण्यात येईल.

७.१ संस्थेने संघाची बाकी दीर्घकाळ थकविली असेल अथवा कर्तव्यात सतत कुचराई केली असेल तर.

७.२ संस्था जाणूनबुजून खोटी विधाने करुन संघाला फसवित असेल तर.

७.३ संस्था संघाच्या इभ्रतीस नुकसान पोहोचविणारे कृत्य करीत असेल तर.

७.४ संस्था दूधात भेसळ करुन संघाला फसवित असेल तर.

७.५ स्थानिक किरकोळ विक्री वगळून आणि संघाच्या पूर्व परवानगिशिवाय संघाव्यतिरिक्त दूध विक्री करीत असेल तर (स्थानिक विक्री फक्त किरकोळ ग्राहकांना कार्यक्षेत्रातच करता येईल.)

७.६ संचालक मंडळ अशा सभासदांना काढून टाकण्यापूर्वी तशी चौदा दिवसाची सूचना (नोटीस) देईल व त्यांचे म्हणणे ऐकून घेईल. अशा रितीने सभासदत्व रद्द झालेल्या सभासदाचे सर्व भाग (शेअर्स) जप्त अगर परत करता येतील.

**८ महाराष्ट्र सहकारी कायदा, कलम 35 अन्वये आणि पोटनियम 10 अन्वये रद्द झालेले सभासद सर्वसाधारण सभेच्या ठरावाने नवीन म्हणून दाखल होऊ शकतील. परंतु नवीन सभासद होतेवेळी त्यांनी पूर्वी धारण केलेल्या भागाइतके नवीन भाग घेणे आवश्यक राहील.**

## 9.भाग हस्तांतर:

९.१ एखादा सामान्य सभासद आपले भाग किमान एक वर्ष धारण केल्यानंतर व संचालक मंडळाच्या मंजुरीने दुस-या सभासदाचे नावे हस्तांतर करु शकेल.

९.२ तथापि असे हस्तांतर भाग हस्तांतर रजिस्टरमध्ये नोंदविल्याखेरीज व प्रत्येक भागांमध्ये 10 रुपये हस्तांतर शुल्क दिल्याखेरीज पूर्ण होणार नाही.

९.३ भाग हस्तांतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम 29 व 30 आणि नियम क्रमांक 24 व 25 मधील तरतुदीस अनुसरुन राहील.

9.4 **सभासदांचे भाग राजीनामा दिल्यानंतर पूर्णपणे संस्थेस परत करताना त्या वर्षाच्या ताळेबंदाप्रमाणे नक्त मूल्य काढून हस्तांतरीत केले जातील. संस्थेचे भाग सभासदास पूर्णपणे परत दिल्यानंतर अशा सभासदास कोणत्याही परिस्थितीत एक वर्षापर्यंत संस्थेचे पुन:श्च सभासद करुन घेणेत येणार नाही. परंतु राजीनामा देताना धारण केलेल्या भागाएवढे भाग घेवून त्यास कोणत्याही वेळी पुन्हा सदस्यत्व प्राप्त करता येईल.**

## 10.सभासदत्व **रद्द होणे:**

सभासदांचे सदस्यत्व खालील कारणास्तव रद्द होऊ शकेल.

१०.१ राजीनामा दिल्यास.

१०.२ संस्था अवसायनात (लिक्विडेशन) काढल्यानंतर

१०.३ पोटनियम क्र. 7 मधील तरतुदीन्वये काढून टाकल्यानंतर.

१०.४ महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा 1960 चे कलम 35 अन्वये सभासदाची हकालपट्टी केल्यास

## **11.भाग परतफेड:**

११.१ राज्य सरकारचे भाग भांडवल मिळाले असल्यास ते राज्य सरकारने ठरविलेल्या मुदतीत आणि पध्दतीने फेडले जाईल.

११.२ राज्य शासनाने भाग भांडवल धारण केलेल्या तारखेपासून भाग 15 वर्षापर्यंत उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांच्या पूर्व अनुमतीशिवाय सभासदांना परत करता येणार नाही.

११.३ एखाद्या सामान्य सभासदाने धारण केलेले भाग भांडवल राज्य सरकारच्या पूर्व परवानगीशिवाय एकूण वसूल भाग भांडवलाच्या एक पंचमांश किंवा वीस हजार रुपये यापैकी जी रक्कम कमी असेल त्यापेक्षा अधिक असणार नाही.

११.४ पोटनियम 7 व 10 मधील तरतुदीनुसार कमी झालेल्या सभासदांचे भाग भांडवल जप्त केले नसल्यास, सभासदत्व कमी झाल्यापासून पोटनियमातील तरतुदीस पात्र राहून एक वर्षाचे कालावधीत परत केले जाईल.

११.४.१ तथापि कोणत्याही सहकारी वर्षात परत करावयाचे भाग भांडवल हे लगतच्या 31 मार्च रोजी असलेल्या संघाच्या एकूण भागभांडवलाचे 10 % पेक्षा अधिक असणार नाही.

११.४.२ संघाने जर एखाद्या सहकारी अथवा इतर संस्थेकडून कर्ज काढले असल्यास त्यांच्या पूर्व संमतीशिवाय कोणतीही भाग रक्कम परत केली जाणार नाही.

११.४.३ भागाची रक्कम परत करताना भागाची किंमत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 नियम क्रमांक 23 मधील तरतुदीनुसार ठरविली जाईल.

## 12. सामान्य सभासदांची कर्तव्ये.

१२.१ सभासद संस्थेने व तिच्या उत्पादक सभासदांनी उत्पादन केलेले दूध स्थानिक किरकोळ विक्री वगळून संघास पुरविले पाहिजे.

१२.२ संचालक मंडळ ठरविल त्या प्रमाणात सभासद, भाग व/ किंवा ऋणपत्रे मालजिनसांच्या किंमतीच्या प्रमाणात खरेदी करतील. अशी खरेदी मागील वर्षी पुरवठा केलेल्या मालजिनसांच्या 20 % किंमतीपेक्षा अधिकराहणार नाही.

१२.३ मालजिनसांचा पुरवठा ठरवून दिलेले स्थळ, वेळ व वाहतुक व्यवस्था याबाबतच्या संघाच्या

सूचना अंमलात आणल्या पाहिजेत.

१२.४ दूध अथवा इतर कोणत्याही माल जिनसा भेसळ न करता संकलन केल्या पाहिजेत.

१२.५ संघाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन केले पाहिजे. संघाचे उद्देशपूर्तीसाठी लागणारी

आवश्यक ती सर्व माहिती संघास पुरविली पाहिजे.

१२.६ सभासदांनी वरील व यासारखी कर्तव्ये बजावणीत कसूर केल्यास परिणामी संघास होणा-या

नुकसानीची जबाबदारी संघाचे संचालक मंडळ ठरविल त्या प्रमाणात बसविण्यात येईल.

## 13.अधिमंडळाची वार्षीक बैठक

१३.१ सर्वसाधारण सभेत खालील व्यक्ती/प्रतिनिधींचा समावेश राहील.

१३.२ संलग्न संस्थांचे अधिकृत प्रतिनिधी.

१३.३ संचालक मंडळ सदस्य.

१३.४ सर्वसाधारण सभेकरिता चेअरमन हे अध्यक्ष राहतील. त्यांचे गैरहजेरीत हजर सभासदांनी संचालक मंडळातील निवडून दिलेला सदस्य अध्यक्ष म्हणून सभेचे कामकाज चालविल.

**13.5 संस्थेच्या सदस्यांच्या सर्व साधारण सभेकडे संस्थेची अखेरची सत्ता राहील. पण ती सत्ता अधिनियम, नियम व उपविधी यातील तरतुदींना अधीन राहील.**

**13.6 संस्थेची पहिली सर्व साधारण सभा नियम क्रमांक 59 मधील तरतुदीनुसार भरविली जाईल व तिच्यात त्याच तरतुदीनुसार कामे केली जातील. पहिल्या सभेव्यतिरिक्त संस्थेच्या इतर सर्वसाधारण सभा नियम 60 मधील तरतुदी नुसार नोंदणी अधिका-याला सूचना देवून आवश्यकते नुसार भरविल्या जातील व त्याच तरतुदीनुसार सदर सभांचे कामकाज करण्यात**

**येईल. परंतु प्रत्येक वर्षी 31 मार्च नंतर 30 सप्टेंबरच्या आंत अधिनियम कलम 75 व नियम 60 मधील तरतुदी नुसार अधिमंडळाची वार्षीक बैठक बोलविणे बंधनकारक राहील. मुदतीत सभा घेण्याची जबाबदारी संस्थेचे अध्यक्ष व मुख्यकार्यकारी अधिकारी/कार्यकारी संचालक/ संचालक/व्यवस्थापक/व्यवस्थापकीय संचालक/सचिव यांची राहील.**

**(अ) नियम 61 अन्वये विहित नमुन्यात तयार केलेले लेख्याचे वार्षीक विवरण पत्रापैकी नफा-तोटा पत्रक व ताळेबंद यांची प्रत, समितीच्या वार्षीक प्रतिवृत्ताची प्रत आणि मागील सहकार वर्षाच्या लेखा परिक्षण ज्ञापनाचा सारांशाची प्रत वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपूर्वी चौदा (14) दिवस अगोदर त्या वर्षाच्या आर्थिक पत्रके असणारा संस्थेच्या कामकाजाचा अहवालासह सभासदांना पाठविला जाईल व नंतर ते सर्वसाधारण सभेच्या मंजूरी करिता ठेवले जातील.**

**ब. सर्वसाधारण सभेने करावयाच्या कामात पुढील कामाचा समावेश होतो.**

**१. खालील कामे वार्षिक सर्वसाधारण सभेतच केली जातील-**

**अ. तक्रार निवारण समितीची नियुक्ती करणे**

**ब. संस्थेच्या मागील लगतच्या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल वाचन करणे.**

**क. लेखापरीक्षण करण्यात आलेले जमा-खर्चाचे लेखे,नफा तोटा पत्रक व ताळेबंद यामध्ये आवश्यकतेनुसार सुधारणा करुन मंजूरी देणे.**

**ड. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस लेखापरीक्षणातील अभिप्रायाच्या अधिनतेने मंजूरी देणे.**

**इ. मागील लगतपूर्व लेखापरीक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल सादर करणे.**

**ई. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या पुढील वर्षाच्या अंदाज पत्रकांस मंजूरी देणे.**

**उ. सदस्यांचे हकालपट्टीबाबत सभेपुढे आलेल्या विषयांचा निर्णय घेणे.**

**ऊ . पुढील आर्थिक वर्षासाठी शासनाने/निबंधकाने मान्य व प्रसिध्द केलेल्या लेखापरीक्षकांच्या नामतालिकेमधील लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे. दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्याच्या आंत लेखापरीक्षण करुन घेणे.**

**2. मागिल सभेत झालेल्या कार्यवृत्तांताचा,कार्यवाहीचा आढावा.**

**3. लेखापरिक्षण अहवालाचा दोषदुरूस्ती अहवाल सादर करणे, विहित मुदतीत दोषदुरुस्ती अहवाल सादर न केल्यास कलम 82 नुसार शास्ती लागू होतील.**

**4. कलम 75 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जर संस्थेच्या सर्वसाधारण सभेने एखादया बाबीवरील खर्च नामंजूर केल्यास सदर मुद्यांसंबधी चौकशी करण्यासाठी निबंधकास कळविणे**

**5. उपविधी क्रमांक 4 मधील मर्यादेस अधीन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाची मर्यादा ठरविणे.**

**6. सहकार खात्याकडून व केंद्रीय सहकारी बँकेकडून आलेला पत्रव्यवहार यांचा विचार करणे.**

**7. नवीन उपविधी स्वीकारणे, अंमलात असलेल्या उपविधीत बदल करणे किंवा काही उपविधी वगळणे.**

**8. लगतपूर्व वर्षात कोणत्याही समिती सभासदास व त्याच्या कुटूंबास (म्हणजे पती,पत्नी,आई,वडील,भाऊ , बहीण, मुलगा,मुलगी, जावई व किंवा सुन यांना) संचालक, सभासद अगर भागीदार असलेल्या संस्था, भागीदार पेढया किंवा कंपन्या यंाना दिलेल्या कर्जाचा, त्याच्या परतफेडीचा व चालू वर्षअखेर येणे राहिलेल्या कर्जाचा तपशील देणारी माहितीपत्रके संस्थेच्या वार्षिक सभेपुढे ठेवली पाहिजेत.**

**9. लेखापरिक्षकांची नियुक्ती रद्य करणे व त्यानुषंागाने पुर्ननियुक्ती करणे.**

**10. इतर कोणत्याही संस्थेशी भागीदारी करार करणेबाबत निर्णय घेणे.**

11. मत्ता व दायित्वे, एकत्रिकरण,विभाजन,हस्तांतरण याबाबतचा निर्णय घेणे.

12. निबंधकाने दाखल केलेल्या चौकशी अहवालावर कार्यवाही करणे.

13. संघीय संस्थेशी संलग्न होणेबाबतचे निर्णय घेणे परंतु असा ठराव संस्थेच्या एकूण सदस्यांच्या 3/4(तीन चतुर्थांश) बहुमताने मंजूर होणे आवश्यक आहे.

14. संघाच्या निरनिराळया व्यवहारांसाठी विभागवार उपसमित्या नेमणे.

15. अधिनियम कलम 76 मधील तरतूदीनुसार संस्थेला विशेष साधारण सभा बोलविता येईल व खालील परिस्थितीत ती एक महिन्यात बोलविलीच पाहिजे

अ) संस्थेच्या एकूण सदस्यांच्या एक पंचमांश सदस्यांनी लेखी मागणी केल्यास

ब) नोदणी अधिकारी यांनी सूचना केल्यास

क) जिल्हा संघ सभासद असलेल्या संघीय संस्थेने मागणी केल्यास

16. सर्वसाधारण सभांची कार्यरित अधिनियम क्रमांक 60 मधील तरतूदीनुसार असेल.

17. अधिमंडळाची वार्षिक बैठकीची 14 दिवसांची आणि विशेष साधारण सभेची सात दिवसांची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रिका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या सचिवाने ती सभा बोलविली पाहिजे व अशा सभेची सूचना नोंदणी अधिकारी यांना दिली पाहिजे. सभेची नोटीस व कार्यक्रमपत्रिका संस्थेच्या कचेरीच्या नोटीस बोर्डावर व संस्थेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या गावातील प्रमुख ठिकाणी डकवून प्रसिध्द केली पाहिजे. अधिमंडळाची वार्षीक बैठकीची नोटिस सभासदाला बजावल्याचा पुरावा संस्थेच्या दप्तरी ठेवला पाहिजे. सदर नोटिशीत सभेची तारीख,नेमकी वेळ,सभेचे ठिकाण व सभेमध्ये केली जाणारी कामे नमुद केली पाहिजेत. संस्थेचा अध्यक्ष व त्याच्या गैरहजेरीत समितीचा उपाध्यक्ष यांनी सचिवासह नोटीशीवर सहया केल्या पाहिजेत.

1. सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या सदस्यापैकी दोन तृतीयांश सदस्यांच्या परवानगीने कार्यक्रम पत्रिकेत दाखल नसलेल्या विषय कोणालाही सभेपुढे मांडता येतील.

2. कोणत्याही साधारण सभेत एकूण सदस्यांच्या संख्येत दोन पंचमांश अगर पंचवीस (यापैकी कमी संख्या असतील एवढे) सदस्य गणपूर्ती (कोरम) करीता आवश्यक असतील.

3. संस्थेचे अध्यक्ष हे अधिमंडळाची वार्षिक बैठकीचे अध्यक्ष राहतील, अध्यक्ष गैरहजर असतील तेव्हा उपाध्यक्ष हे अध्यक्ष म्हणून काम पाहतील. ज्यावेळी अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही गैरहजर असतील त्यावेळी हजर असणा-या सभासदांमधून त्या सभेपुरता अध्यक्ष निवडला जाईल.

4. अधिनियम कलम 27 व नियम क्रमांक 60 मधील तरतुदींनुसार साधारण सभेत मतदान केले जाईल. सभेस हजर असणा-या प्रत्येक सदस्यास एकापेक्षा जास्त मत देण्याचा अधिकार असणार नाही. सभासद क्रियाशील सभासद नसल्यास त्यास सर्वसाधारण सभेत मतदान करता येणार नाही. अध्यक्षास एक निर्णायक मत असेल. एखाद्या ठरावावर (मतैक्य न झाल्याने) सदस्य विभागले गेले असतील तेव्हा, मतदान करणा-या कोणाही सदस्याला मतमोजणी (पोल) करण्याची मागणी करता येईल. त्यानंतर अध्यक्षाने ती मंजूर केली पाहिजे. समितीच्या अगर इतर निवडणूका उपविधी मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे गुप्त मतदान पध्दतीने करावयाच्या असल्यास त्यांचे निकाल सोडून प्रत्येक ठरावाचा निकाल हात उभारुन केलेल्या मतदानावरुन केला जाईल. मतदान करणा-या सदस्यांच्या बहुमताने प्रत्येक ठराव मंजूर केला जाईल.

5. अधिमंडळाची वार्षिक बैठकीतील मतदानाचा अधिकार:- क्रियाशील सभासदालाच साधारण सभेमध्ये कामकाजात भाग घेण्याचा व मतदानाचा अधिकार राहील.

अ. कोणत्याही नाममात्र तसेच/अक्रियाशील सदस्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.

**ब. थकबाकीदार सभासदास संस्थेच्या साधारण सभेच्या कामकाजात मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.**

**6. सर्वसाधारण सभेत पास झालेल्या कोणत्याही ठरावात बदल करण्यासंबंधीचे ठराव, साधारण सभेत पास झालेल्या मूळ ठरावाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत नोंदणी अधिकारी यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही साधारण सभेत आणता येणार नाही.**

**7. संस्था ज्या इतर संस्थांची सदस्य झाली असेल अशा संस्थांच्या साधारण सभांना संस्थेतर्फे प्रतिनिधी म्हणून हजर राहण्याबद्दल व मत देण्याबद्दल अधिनियम कलम 27 च्या तरतुदींना अधीन राहून, संस्था वेळोवेळी ठरवेल.**

**मात्र अक्रियाशील/नाममात्र सदस्याला अशा रितीने प्रतिनिधी म्हणून पाठविता येणार नाही. तसेच निबंधकाने नियुक्त केलेल्या प्रशासकास मतदानाचा अथवा संस्थेचे वतीने निवडणूक प्रक्रियेत भाग घेण्याचा अधिकार असणार नाही. अशा वेळी प्रशासक विशेष सर्वसाधारण सभा बोलवून सभासद प्रतिनिधीची नेमणुक करेल.**

**8. वृत्तांत पुस्तकांत चिटणीसाने सर्वसाधारण सभेचा वृत्तांत अशी सभा पार पडल्यापासून पंधरा दिवसांचे आत लिहून लगतच्या समिती सभेत अंमलबजावणीसाठी ठेवला पाहिजे.**

**18. अधिमंडळाची वार्षिक बैठकीपुढे कायदा कलम 75 (2) नुसार आवश्यक ती विवरणपत्रे ठेवणे अनिवार्य आहे.**

**19. कायदा कलम 75 (4) नुसार अधिमंडळाची वार्षिक बैठकी पुढे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल ठेवणे अनिवार्य आहे. तसेच अधिमंडळाची वार्षिक बैठकीत नियम 62 अन्वये (न ) नमुन्यात तयार केलेली नफा तोटापत्रके सादर करण्यात येतील तसेच मागील लेखापरिक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवालास अधिमंडळाची वार्षिक बैठक ची मान्यता घेण्यात येईल.**

**20. अधिमंडळाची वार्षिक बैठकीच्या मान्यतेने सहकारी संस्थेतील अंतर्गत वाद तक्रारी सोडविण्यासाठी संस्था स्तरावर कायदा कलम 89 अ ब प्रमाणे तक्रार निवारण समितीची नियुक्ती करण्यात येईल. सदर समिती मध्ये संचालक नसलेल्या तीन क्रियाशिल सदस्याची नेमणुक करण्यात येईल. संस्थेतील वाद सोडविण्यासाठी समुपदेशन, लवाद, न्यायालयीन तडजोड (लोक अदालत) मध्यस्थी इत्यादी प्रकारे तडजोड करुन तक्रार निवारण समिती शक्यतो तीन महिन्याच्या आत सुनावणी घेऊन निर्णय घेईल.**

**संस्था आपल्या अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीत, राज्य शासनाने मान्यता दिलेल्या नामिकेमधुन, कलम 80 मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे किमान अर्हता व अनुभव असणा-या लेखापरीक्षकाची किंवा लेखापरीक्षण करणा-या संस्थेची चालू वित्तीय वर्षासाठी नेमणुक करील आणि अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, नेमणुक केलेल्या लेखापरीक्षकाचे नांव आणि संस्थेच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्यासाठीची त्याची लेखी संमती हे विवरणाच्या स्वरुपात निबंधकाकडे दाखल करील.**

**21. अधिमंडळाची वार्षिक बैठकीत करावयाच्या कामात खालील कामाचा समावेश होतो.**

संस्थेच्या मागील सालच्या कामाचे, अधिनियम कलम क्रमांक 75 मधील तरतुदीनुसार तयार केलेले प्रतिवृत्त व नियम क्रमांक 61 व 62 मधील तरतुदीनुसार तयार केलेली त्या सालची जमा व खर्च, नफा व तोटा आणि जिंदगी व कर्ज दाखविणारी पत्रके समितीकडून घेणे व ती नफयाच्या विभागणीसह मंजूर करणे अगर त्यात जरुर वाटतील त्या दुरुस्त्या करुन मंजूर करणे.

उपविधी क्रमांक 3 मधील मर्यादेस अधीन राहून पुढील वर्षाकरिता उभारावयाच्या बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे.

२२. **संस्थेचे वैधानिक लेखापरिक्षणा करिता शासन मान्य यादीतील शासकीय लेखापरिक्षक/ सनदी लेखापाल/प्रमाणित लेखापरिक्षक यांची नेमणुक**

**करुन सदर नेमणुकीस वार्षिक सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्यात यावी.**

२३. संस्थेची लेखा परीक्षा यादी, समितीने तिच्यावर केलेले दोष दुरुस्ती प्रतिवृत्ती (रिपोर्ट), सहकारी खात्याकडून व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून आलेला पत्रव्यवहार यांचा विचार करणे.

२४. **अधिमंडळाची वार्षिक बैठकचा** वृत्तांत त्यांच्या वृत्तांत पुस्तकात व्यवस्थापकाने पंधरा दिवसांत लिहून ठेवला पाहिजे.

## 14.संचालक मंडळ:

14.1 संघाच्या स्ंाचालक मंडळाने संघाच्या कामकाजाची व्यवस्था पाहिली पाहिजे. संचालक मंडळात पंधरा संचालक असतील. संचालक मंडळाचा कालावधी निवडणूक दिनांकापासून पुढे पाच वर्षे इतका राहील.समितीची निवडणूक दर पाच वर्षानी राज्य सहकारी प्राधिकरणामार्फत घेतली जाईल. तसेच संघाच्या पदाधिका-यांचा कालावधी संघाच्या संचालक मंडळाच्या कालावधी इतका राहील.

संचालक मंडळाची रचना पुढील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| 14.2 सभासद प्राथमिक दूध उत्पादक संस्थांचे प्रतिनिधी (सर्वसाधारण मतदार संघ) | 10 |
| 14.3 अनुसूचित जाती/जमाती प्रतिनिधी | 1 |
| 14.4 महिला प्रतिनिधी | 2 |
| 14.5 इतर मागास वर्गीय प्रतिनिधी | 1 |
| 14.6 भटक्या विमुक्त जाती व जमाती व विशेष मागासप्रवर्ग प्रतिनिधी | 1 |
| एकुण: | 15 |

14.7 सर्वसाधारण मतदार संघातील प्रतिनिधी तसेच अनुसूचित जाती/जमाती, महिला प्रतिनिधी, इतर मागास वर्गीय, भटक्या विमुक्त जाती व जमाती व विशेष मागासप्रवर्ग यांची निवड संपूर्ण तालुक्यातून मतदार संघामधून केली जाईल.

14.8 संचालक मंडळ आपल्या मुदतीच्या कालावधीसाठी अथवा एक वर्षाच्या कालावधीसाठी दूध उत्पादक संस्थांशी संबंधित असणा-या व दूध व्यवसायातील तज्ञ समजली जाईल अशा दोन व्यक्तिची तज्ञ संचालक म्हणून नियुक्ती करु शकेल.

14.9 **सदर व्यवस्थापकीय समिती मध्ये दोन तज्ञ संचालक नियुक्त करता येतील. सदर संचालकांना संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत भाग घेता येईल. मात्र त्यांना अध्यक्ष/उपाध्यक्ष या पदासाठी च्या निवडणूकीत मतदान करता येणार नाही.**

14.10 **संघाचे व्यवस्थापक हे कार्यलक्षी संचालक (functional Director) म्हणून संचालक मंडळावर कार्यरत राहातील. कार्यलक्षी संचालकांना संचालक मंडळाच्या निवडणूकीत अथवा संचालक मंडळाच्या सभेत मतदानाचा अधिकार असणार नाही. जर संचालक मंडळाची संख्या 17 पर्यंत असेल तर □ कार्यलक्षी संचालक संख्या 1 असावी व संचालक मंडळाची संख्या 18 ते 21 असेल तर कार्यलक्षी संचालक संख्या 2 असेल**

**अ)** संचालक मडळाची **निवडणूक दर पाच वर्षानी होईल.**

**संचालक मंडळ सभेची गणपूर्ती होण्यास एकुण सदस्य संख्येच्या 50 टक्के पेक्षा अधिक एक सदस्य संख्या आवश्यक राहील. अशा प्रकारे गणपूर्ती झाल्यानंतर सभेचे कामकाज करता येईल. सदर गणपूर्तीच्या गणनेत तज्ञ संचालक व कार्यरत संचालक यांचा समावेश होणार नाही.**

**ब) थकबाकीदार/अक्रियाशिल सभासदाना मतदानाचा अधिकार असणार नाही.**

14.11 संघाच्या चेअरमनची निवड पोटनियम क्र. 14.2, 14.3 व 14.4 व 14.5, 14.6 मधुन निवडून आलेल्या प्रतिनिधी मधूनच केली जाईल.

14.12 निवडून आलेल्या संचालक मंडळाची मुदत, निवडणूकीच्या दिनांका पासून पाच वर्षाची राहील.

14.13 निवडून आलेले संचालक मंडळ पुढील संचालक मंडळ अधिकारावर येईपर्यंत अस्तित्वात राहील.

14.14 संचालक मंडळाच्या सभेस संघाचे चेअरमन अध्यक्ष राहतील. तथापि चेअरमनच्या गैरहजेरीत हजर असलेल्या संचालकांनी निवडलेले संचालक त्या सभेचे अध्यक्ष म्हणून कामकाज चालवतील.

14.15 संचालक मंडळाच्या सभा आवश्यक असेल तितक्या वेळा बोलविता येतील परंतु संचालक मंडळाची महिन्यातून एक तरी सभा घेतली पाहिजे.

14.16 सर्वसाधारणपणे संचालक मंडळाची सभा, सात दिवसांच्या पूर्व सूचनेनुसार बोलविण्यात येईल तथापि आवश्यकतेनुसार कमीत कमी तीन दिवसांच्या पूर्वसूचनेवरुन संचालक मंडळाची सभा बोलविता येईल.

14.17 एकूण निर्वाचित संचालकांच्या संख्येच्या निम्मे अधिक एक इतके संचालक सभेस उपस्थित असल्यास सभेची गणपूर्ती पूर्ण होईल.

14.18 प्रत्येक संचालकास एक मत देण्याचा अधिकार राहील.

14.19 संचालक मंडळाच्या सभेतील निर्णय हजर संचालकांच्या बहुमताने घेतले जातील. पदाधिका-यांच्या निवडणूकी शिवाय इतर ठरावा बाबत समान मताचे वेळेस चेअरमन यांना एक जादा निर्णायक मत देण्याचा अधिकार राहील.

14.20 संचालक मंडळाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, एखादा संचालक, संचालक मंडळाच्या लागोपाठ तीन सभांना गैरहजर राहिल्यास त्या संचालकाचे संचालक मंडळावरील सदस्यत्व आपोआप रद्द होईल. अशा प्रकारे रिकाम्या झालेल्या पदांची माहिती, संबंधित अधिका-यांना एक महिन्याच्या आत कळविण्यात येईल.

14.21 एखादा संचालक, स्वत:चे व्यक्तिगत हित संबंध असलेल्या विषयाच्या चर्चेच्यावेळी हजर राहू शकणार नाही व त्यावर तो मतही देऊ शकणार नाही.

14.22 काही अत्यंत निकडीच्या कामासाठी संचालक मंडळाची वेळेवर सभा घेता आली नाही तर संस्थेच्या संचालकांकडे सर्क्युलर, पाठवून त्यांची मते घेऊन ठराव करावेत. असे ठराव संचालक मंडळाच्या पुढील सभेत मंजूरीसाठी ठेवण्यात यावेत.

सर्क्युलर ठरावावर सहया करणे याचा अर्थ संचालक मंडळाच्या सभेस हजर आहे असे गृहित धरले जाणार नाही. सर्क्युलर ठरावाद्वारे पोटनियम बदलणे, सभासदास कमी करणे, एखाद्या सभासदास कर्जे देणे अगर नवीन सभासद करुन घेणे, अविश्वासाचा ठराव आणणे या बाबींवर निर्णय घेता येणार नाही.

14.23 संचालक मंडळ किंवा संचालक मंडळाचा सदस्य याच्या नेमणुकीबाबत काही दोष असल्याचे मागाहून आढळून आले तरीही संचालक मंडळ किंवा संचालक या नात्याने केली गेलेली मंडळाची सर्व कामे त्या मंडळाची अगर त्या संचालकाची निवडणूक योग्य रितीने झाली होती असे गृहित धरुन कायदेशीर समजण्यात येतील.

14.24 आवश्यक असल्यास संचालक मंडळाच्या बहुमताने संघाच्या उद्देशपूर्तीच्या अनुषंगाने काम करणा-या संघटनांचे प्रतिनिधी संचालक मंडळ बैठकीस बोलाविता येतील. अशा निमंत्रित सदस्यांना संबंधित विषयाबाबतच्या चर्चेत भाग घेता येईल.

14.25 संचालक निवडणूकीसाठी संपूर्ण तालुका हा एक मतदार संघ राहील. म्हणजेच तालुका संघाचे सर्व पात्र मतदार संपूर्ण संचालक मंडळ निवडून देतील.

14.26 संचालक मंडळाच्या निवडणूकीसाठी सामान्य सभासद प्रतिनिधींना आवश्यक असणारी पात्रता

संघाच्या संचालक मंडळावर निवडून येण्यासाठी कोणत्याही सभासद संस्थेच्या प्रतिनिधीची त्या संस्थेने खालील बाबींची पूर्तता केल्याशिवाय निवडणूकीस उभे राहता येणार नाही.

14.26.1 प्राथमिक दूध सहकारी संस्थेने कायदयाच्या कलम 27 (3) ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

14.26.2 सभासद संस्था ऑडिट झालेल्या शेवटच्या वर्षी अ अथवा ब ऑडिट वर्गात असली पाहिजे

14.26.3 सभासद संस्थेच्या पंचकमिटीने आपल्या प्रतिनिधीला संघाचे संचालक मंडळाची निवडणूक लढविणेबाबत अधिकार दिल्याबद्दलचा ठराव तसेच दुस-या

कोणत्याही प्रतिनिधीला प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार दिलेला नाही अशा प्रकारचा ठराव संघास मिळालेला असला पाहिजे.

## 15. संचालक मंडळाचे अधिकार, कामे व जबाबदा-या:

15.1 सदस्य होण्यासाठी व भागासाठी आलेल्या अर्जाचा निकाल करणे.

15.2 कर्ज काढणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच्या अटी ठरविणे.

15.3 विवक्षित क्षेत्रापुरत्या अगर त्या कामाकरिता उपसमित्या नेमणे.

15.4 अनामत रक्कमा, विक्रीमालाच्या रकमा वसूल करण्याची तजवीज करणे.

15.5 संस्थेच्या कामासंबंधी होणारा खर्च मंजूर करणे.

15.6 व्यवस्थापकाकडून वेळच्या वेळी हिशेब लिहून घेणे व तपासणे व रोख शिल्लक मोजून पाहणे.

15.7 **अधिनियम कलम 75 व नियम क्र. 61 मधील तरतुदीनुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर कलम 79 मध्ये नमुद केलेली खालील विवरणपत्रे नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठविणे-**

15.7.1 **संस्थेच्या कार्याची माहिती देणारा वार्षिक अहवाल**

15.7.2 **लेखापरीक्षण अहवाल.**

15.7.3 **नफा वाटणी.**

15.7.4 **उपविधी दुरुस्ती असल्यास.**

15.7.5 **वार्षिक सभेची तारीख व निवडणूक असल्यास त्याची तारीख.**

15.7.6 **निबंधकाने कायदा/नियम/उपविधी अनुसार विचारलेली इतर माहिती.**

15.7.7 **लेखापरीक्षकाची नेमणुक व त्याची संमती.**

**15.8 संस्था, प्रत्येक वित्तिय वर्ष समाप्त होण्याच्या सहा महिन्यांच्या आत तिच्या अशा लेख्यांची संबंधित विवरणपत्रे निबंधकाकडे दाखल करील. विवरणपत्रामध्ये पुढील बाबींचा समावेश असेल:-**

15.8.1 **तिच्या कार्यांचा वार्षिक अहवाल.**

15.8.2 **त्याच्या लेखांची लेखापरिक्षित विवरणे.**

15.8.3 **संस्थेच्या अधिमंडळाने, मान्यता दिल्याप्रमाणे शिल्लक रकमेचा विनियोग करण्यासाठीच्या योजना.**

15.8.4 **संस्थेच्या उपविधींच्या सुधारणांची यादी, कोणतीही असल्यास.**

15.8.5 **अधिमंडळाची बैठक घेण्याची आणि निवडणुका घेण्याचा दिनांक संबंधात प्रतिज्ञापन.**

15.8.6 **या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींनुसार निबंधकाला आवश्यक असेल अशी कोणतीही अन्य माहिती.**

१५.८.७ **संस्था अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत अधिमंडळाच्या लेखी संमतीने, तिच्या बैठकीत, राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या नामिकेतून नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकाच्या किंवा लेखा परीक्षण व्यवसाय संस्थेच्या नावाशी संबंधित विवरणपत्रे देखील दाखल करील.**

१५.८.८ अधिनियम कलम क्रमांक 75 व नियम क्रमांक 61 मधील तरतुदीनुसार वार्षिक अहवाल व ताळेबंद पत्रके वर्ष संपल्यावर 45 दिवसांत तयार करणे व ते तयार केल्यापासून 15 दिवसांत लेखा परीक्षक यांचेकडे पाठविणे.

## 16. संचालक मंडळाची जबाबदारी-

16.1.1 संघाची सर्व प्रकारची धोरणे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार संचालक मंडळास राहील. संचालक मंडळ सर्व प्रकारचे अधिकार वापरुन करार दस्तऐवज व त्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता करण्याची वा करवून घेण्याची व्यवस्था करेल. संघाचे उद्देश पूर्तीसाठी आवश्यक असलेल्या सर्व तरतुदी व कार्यवाही आणि कायदा नियम व पोटनियम यास अधिन राहून संघाचा विकास व हितसंबंध वृध्दीसाठी सर्व प्रकारच्या योजना आखण्याचा व राबविण्याचा अधिकार संचालक मंडळावर राहील.

16.1.2 या पोटनियमान्वये दिलेल्या सर्वसाधारण अधिकारास बाधा न आणता संचालक मंडळाचे अधिकार व कर्तव्ये खालील प्रमाणे आहेत.

16.1.3 मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

16.1.4 सभासदत्व भाग, भाग हस्तांतर, ऋणपत्रे इत्यादीसाठी आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

16.1.5 कर्जे व ऋणपत्रे उभारणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच्या शर्ती निश्चित करणे.

16.1.6 सभासदांकडून त्यांचे संघाशी असलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात व पोटनियमातील तरतुदीनुसार भागभांडवल जमा करणे आणि किंवा ऋणपत्रे स्वीकारणे.

16.1.7 मासिक/त्रैमासिक हिशोबपत्रके महसूल आणि भांडवली खर्च मंजूर करणे.

16.1.8 लेखापरिक्षा अहवालावर विचार करणे आणि दोषदुरुस्ती अहवाल पाठविणे.

16.1.9 31 मार्च रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे ताळेबंद, नफा-तोटा पत्रके मंजूर करुन प्रमाणित करणे. नफा विभागणीची शिफारस करणे आणि वार्षिक अहवाल, मागील वर्षाची प्रगती अहवाल, सभांची कार्यक्रमपत्रिका आणि पुढील वर्षाचे अंदाजपत्रक **अधिमंडळाची वार्षीक बैठकीपुढे** ठेवण्यासाठी सादर करणे.

16.1.10 रोख, शिल्लक माल, भांडार माल, महत्वाचे दस्तऐवज व रोखे हाताळणा-या कर्मचा-यांकडून चोरी, अफरातफर, नुकसान होऊ नये यासाठी पुरेशी सुरक्षिततेची व्यवस्था करणे.

16.1.11 संघाच्या मालमत्तेचा विमा उतरविणे व एजन्सी तत्त्वावर विम्याचे काम हाती घेणे.

16.1.12 संघाच्या उपयोगाकरिता जमिनी, इमारती, यंत्रसामग्री, औजारे इ. खरेदी करुन अगर भाडेपट्टीने जमिनी, इमारती खरेदीस सर्वसाधारण सभेच्या पुर्वसंमतीने मंजूरी देणे, मालजिनसा ठेवण्यासाठी गोदामे उभारणे अथवा भाडेपट्टीने संपादन करणे, कार्यालयासाठी इमारती बांधणे अथवा भाडयाने घेणे, सभासद संस्थांना संघाची स्थावर व जंगम मालमत्ता, मालजिनसा विकणे अथवा भाडेपट्टीने देणे. या सर्व बाबींकरता साधारण सभेची पूर्वसंमती घेणे आवश्यक आहे.

16.1.13 संघाचे कामकाज सुरळित चालण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा निर्माण करणे व संघाच्या कर्मचा-यांसाठी सेवानियम करणे. निरनिराळी पदे, आवश्यकतेनुसार निर्माण करणे, कर्मचा-यांचे सेवानियम व वेतनश्रेणी ठरविणे व कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिकारी यांची नेमणूक करणे याबाबत संचालक मंडळ यासाठी प्रस्थापित केलेल्या तज्ञ मंडळाच्या शिफारशी विचारात घेईल.

16.1.14 संचालक मंडळ खालील बाबींवर विचार करण्यासाठी एक तज्ञ मंडळ नियुक्त करेल.

अ. प्रशासकीय यंत्रणेचे स्वरुप

ब. सेवक नेमणुकीसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव सेवानियम व वेतनश्रेणी ठरविणे.

क. वरिष्ठ अधिका-यांसाठी शैक्षणिक पात्रता, अनुभव वेतनश्रेणी व कामकाजाचे स्वरुप ठरविणे.

ड. कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिका-यांची नेमणूक करण्याबाबत संचालक मंडळावर शिफारस करणे.

इ. कार्यकारी संचालक/वरिष्ठ अधिकारी यांची नेमणुक सहा महिन्यापेक्षा अधिक कालावधीकरीत प्रभारी स्वरुपाची असणार नाही.

16.1.15 तज्ञ मंडळाच्या शिफारशीनुसार वरिष्ठ अधिका-यांची नेमणूक करणे, अशा अधिका-यांना शिक्षा करणे, निलंबित करणे अथवा काढून टाकणे.

16.1.16 कार्यकारी संचालकांची तज्ञ मंडळाच्या शिफारशीनुसार नेमणूक करणे तसेच संचालक मंडळाच्या ठरावाने निलंबित करणे. कार्यकारी संचालक पदासाठी खालील पात्रता राहील.

1. दुग्ध व्यवसाय तंत्रशाखेची पदवी किंवा पशुसंवर्धन, कृषि, फूड टेक्नॉलॉजी, इंजिनियरिंग यापैकी एका शाखेतील पदवीधर वरील पात्रतेबरोबरच व्यवस्थापन शाखेतील (बिझनेस मॅनेजमेंट) आणि कायदा पदवीधर असणा-यांना प्राधान्य दिले जाईल.

2. तीन ते पाच वर्ष दुग्ध व्यवसाय अनुभव त्यापैकी तीन वर्षे मोठया कारखान्यात काम केले असले पाहिजे.

3. उमेदवार हा व्यवस्थापन निष्णात असला पाहिजे किंवा दुग्धव्यवसाय किंवा सहकारी खात्यातील वरील पात्रता धारण करणारे अधिकारी.

16.1.17 संचालक मंडळाला कार्यकारी संचालक व वरिष्ठ अधिका-यासह संघाचे इतर सेवक नेमण्याचा तसेच निलंबित करण्याचा अधिकार असेल. तथापि त्यांना सेवेतून कमी करण्यापूर्वी संबंधीतांना त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी देणे आवश्यक असेल.

16.1.18 शासन व इतर संघटनांशी दस्तऐवज, खरेदी विक्री, हस्तांतर इ. व्यवहार करणे व यासाठी दोन किंवा अधिक संचालकांना अधिकार प्रदान करणे.

16.1.19 संघाच्या व्यवहारात अनावश्यक असलेली जमीन व इतर स्थावर व जंगम मालमत्ता सर्व साधारण सभेच्या मान्यतेने व निबंधकाच्या पुर्व परवानगीने विकणे.

16.1.20 मालजिनसांची उधारीवर विक्री करणेचा अधिकार कार्यकारी संचालकांना देणे.

16.1.21 निबंधकांनी विचारणा केल्यास संलग्न व्यवस्थापन स्वीकारण्यास मंजूरी देणे.

16.1.22 कर्मचा-यांच्या कल्याणासाठी विश्वस्तनिधी स्थापन करणे. त्यासाठी भांडवल उभारणे व निधीस साहाय्य करणे.

16.1.23 संघाच्या वतीने किंवा संघाविरुध्द दाखल केलेली कायदेशिर कार्यवाही सुरु करणे, चालविणे, बचाव करणे, तडतोड करणे किंवा मागे घेणे याबाबतचे सर्व अधिकार संचालक मंडळाला राहतील तसेच एखादी कर्जाऊ येणे रक्कम आणि इतर कोणत्याही प्रकारचे संघाचे किंवा संघाविरुध्द दावे योग्य त्या तडजोडीने सोडविण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

16.1.24 संचालक मंडळाच्या मते एखाद्या सभासदाची वर्तणूक संघास अहितकारक आहे असे वाटल्यास सदर सभासदास 3/4 मतांनी काढून टाकण्याची सर्वसाधारण सभेस शिफारस करणे.

16.1.25 संघाने स्वत:साठी एक मुद्रा (सील) तयार करुन ती संघाच्या कार्यकारी संचालक यांच्याकडे सुरक्षिततेसाठी ताब्यात ठेवावी. संघाच्या संचालक मंडळापैकी एक संचालक यांच्या उपस्थितीत त्यांनी दस्तऐवजावर किंवा करारपत्रकावर सही करुन ही मुद्रा मोर्तब करावी.

16.1.26 संचालक मंडळास पोटनियमानुसार प्राप्त झालेले अधिकार कर्तव्ये यापैकी सर्व किंवा काही अधिकार/कर्तव्ये संघाच्या वरिष्ठ अधिका-यांना प्रदान करण्यास मंजूरी देणे.

16.1.27 कार्यकारी संचालकांना पोटनियमानुसार प्राप्त झालेले अधिकार कर्तव्ये यापैकी सर्व किंवा काही अधिकार/कर्तव्ये संघाच्या वरिष्ठ अधिका-यांना प्रदान करण्यास मंजूरी देणे.

16.1.28 संचालक मंडळास आवश्यक वाटल्यास संघास झालेले अपहार किंवा अहितकारक कृत्ये इ. बाबत चौकशी करण्यासाठी कमाल चार सदस्यांची एक तदर्थ समिती नियुक्त करता येईल. तथापि अशा समितीमध्ये किमान एक नियुक्त संचालक असेल. या समितीची मुदत ठराविक काळासाठी मर्यादित राहील.

16.1.29 कामकाज व्यवस्थितपणे चालविण्यासाठी सहकारी कायदा, नियम पोटनियम यांना अधिन राहून सुसंगती असे पूरक नियम तयार करण्याचा संचालक मंडळास अधिकार राहील.

16.1.30 संघाचे कामकाजाची वेळ ठरविणे, कार्यालयासाठी वार्षिक सुट्टया जाहीर करणे.

16.1.31 संलग्न संस्थांच्या कामावर देखरेख ठेवणे व आवश्यक वाटल्यास त्यासाठी उपनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) यांचे मंजूरीने शुल्क ठरविणे व वसूल करणे.

16.1.32 संघाच्या मालजिनसीचे संकलन, उत्पादन, वितरण, विक्री इत्यादी व्यवहाराबाबत नियम करणे.

16.1.33 एखाद्या संलग्न संस्थेच्या सभासदाने संघाला भेसळयुक्त मालजिनसा पुरविल्याने किंवा संघाशी केलेल्या करारातील अटींचे पालन न केल्यास त्याचे त्या संस्थेतील सभासदत्व रद्द करविण्यासंबंधी संलग्न संस्थेस शिफारस करता येईल.

16.1.34 कर्ज पुरवठा व अनुदान देणा-या अर्थसाहाय्य संस्थांनी व संघानी परस्पर मान्य केलेल्या नियम व अटींचे संघाने पालन करण्याची जबाबदारी संचालक मंडळावर राहील. तसेच **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला, तिची मुदत संपण्याच्या किमान सहा महिन्यांपूर्वी आपला पदावधी संपण्याबाबत कळवील.**

16.1.36 **समितीमध्ये किंवा तिच्या पदाधिका-यांमध्ये निर्माण झालेल्या कोणत्याही नैमित्तिक रिक्त पदाबाबत असे रिक्त पद निर्माण झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कळविल.**

**16.1.37 राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने विहित केलेल्या दिनदर्शिकेनुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला आवश्यक असणा-या अशा नोंदवहया, अभिलेख आणि माहिती पुरविल.**

**16.1.38 निवडणुका घेण्यासाठी मतदार यादी सुरळीतपणे तयार करण्याकरिता आवश्यक ती सर्व मदत, सहाय्य व सहकार्य पुरवील.**

## 17. चेअरमन:

17.1 चेअरमनची कामे व अधिकार:-

17.1.1 संघाचे सर्व व्यवहारावर चेअरमन यांचे सर्वसाधारण नियंत्रण व मार्गदर्शन राहील.

17.1.2 संचालक मंडळाची सभा चालविणे.

17.1.3 चेअरमनच्या अधिकृत रजेच्या मुदतीत संचालक मंडळाने निवडलेला सदस्य वरील कामे पाहील.

17.1.4 वरील चेअरमन निवडून येईपर्यत अधिकारपदावर असलेले चेअरमन संघाचे काम पाहतील.

17.1.5 काही कारणामुळे चेअरमनची जागा रिकामी झाल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यकारी संचालक किंवा तत्सम जबाबदारी दिलेला संघाचा अधिकारी अथवा समितीने रिक्त झालेल्या जागे संबंधी 15 दिवसाच्या आत राज्य सहकारी निवडणूक आयोगास प्राधिकरणास कळविले पाहिजे.

## 18. कार्यकारी संचालक

18.0 कार्यकारी संचालक यांचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील.

18.1.1 संघाचे कामकाज, सेवकवर्ग व प्रशासनावर सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे, तसेच आवश्यक त्या वेळेस कार्यालयीन आदेश काढणे.

18.1.2 सर्वसाधारण सभा व विशेष सर्वसाधारण सभा तरतुदीस अनुसरुन बोलविणे.

18.1.3 संचालक मंडळ व सर्वसाधारण सभेचे सचिव म्हणून काम करणे व अशा सभांचे कार्यवृत्तांत नोंद करुन ठेवण्याची व्यवस्था करणे.

18.1.4 ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी जरुर तेथे संबंधितास सूचना देणे.

18.1.5 वरिष्ठ अधिकारी वगळून व इतर सेवकांची मंजूर झालेल्या प्रशासकीय यंत्रणेत कायदा, नियम व पोटनियमातील तरतुदीस अनुसरुन नेमणूक करणे.

18.1.6 वरिष्ठ अधिकारी वगळून संघाच्या सेवकांना शिक्षा देणे, निलंबित करणे व संचालक मंडळाच्या पूर्वपरवानगीने कमी करणे.

18.1.7 संघाच्या सेवकांसाठी आवश्यक ते प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

18.1.8 संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादित मालजिनसांची उधारीवर विक्री करणे.

18.1.9 मालजिनसा, वाहतुक, साठवणूक विक्री इ. साठी व्यवस्था करणे.

18.1.10 संघाच्या वतीने शासन व इतर संस्थांशी वाटाघाटी करणे.

18.1.11 संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादेत महसूली खर्च करणे.

18.1.12 संघाच्या मालमत्तेचा विमा उतरविणे.

18.1.13 संघाचे हिशोब नियमित पूर्ण करुन ठेवण्याची व्यवस्था करणे.

18.1.14 दर तिमाहीतून एक वेळ रोख शिल्लक व शिल्लक मालाची तपासणी अगर पडताळून पाहण्याची व्यवस्था करणे.

18.1.15 कार्यकारी संचालकांस संघाच्या वतीने धनादेश, हुंडया व इतर वचन पत्रके (निगोशियेबल इंन्स्टूमेंट) व सर्व प्रकारच्या ठेव पावत्यांवर सहया करण्याचा अधिकार राहील. तसेच त्यांना संघाच्या वतीने बँकातील सर्व प्रकारची खाती चालविता येतील.

18.1.16 संघाच्या वतीने दावा/दावे सुरु करता येईल. तसेच संघाविरुध्दचे दावा/दावे कार्यकारी संचालकांच्या नावे चालतील.

18.1.17 संघाच्या वतीने होणा-या वचन चिठ्ठया व करारनामे कार्यकारी संचालकांच्या नावे राहतील.

18.1.18 कर्जरोखे, करारपत्रे व इतर महत्वाचे कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणे.

18.1.19 संचालक मंडळाच्या विचार विनिमय व मान्यतेसाठी वार्षिक अहवाल ताळेबंद, नफातोटा पत्रक व व्यापारी पत्रक तयार करण्याची व्यवस्था करणे.

18.1.20 संचालक मंडळापुढे लेखा परिक्षण अहवाल विचारार्थ ठेवणे व दोषदुरुस्ती करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे. संचालक मंडळाच्या मान्यतेने दोषदुरुस्ती अहवाल लेखानिरिक्षकांकडे पाठविणे.

18.1.21 कार्यकारी संचालकांस आपले काही अधिकार व जबाबदा-या संचालक मंडळाच्या पूर्व परवानगीने संघाच्या वरिष्ठ अधिका-यांना आवश्यकतेनुसार प्रदान करता येतील. तथापि या बाबतचे अंतिम नियंत्रण व अधिकार कार्यकारी संचालकाकडेच राहतील.

18.1.22 सर्वसाधारण सभेच्या ठरावातील मार्गदर्शनपर सूचना कायदा, नियम व पोटनियमातील तरतुदीस अनुसरुन संघाचा कारभार व्यवस्थितीत  चालविण्याचा अधिकार व जबाबदारी कार्यकारी संचालकाची राहील.

18.1.23 कार्यकारी संचालकांच्या अनुपस्थितीत तो पदभार चेअरमनच्या मान्यतेने दुस-या वरिष्ठ अधिका-यास दिला जाईल.

18.1.24 संघाच्या कार्यक्षेत्रातील दूध संकलन, गुणनियंत्रण व वाहतुक यंत्रणा, बर्फ पुरवठा याबाबत सभासदांच्या अडीअडचणींचे निवारण करणे व नियमितपणे संचालक मंडळापुढे अहवाल ठेवणे.

18.1.25 संलग्न संस्थांच्या कामकाजाची तपासणी व देखरेख करण्याची व्यवस्था करणे. संलग्न संस्थांच्या सभासदांना दूध पुरवठयाचे पेमेंट वेळेवर व नियमानुसार मिळेल याची दक्षता घेणे.

18.1.26 संघाने अंगिकारलेले दूध उत्पादन वाढ, पशुसंवर्धन, समतोल पशुआहार, चारा व वैरण विकास, कृत्रिम गर्भधारणा व पशुआरोग्य सेवा राबविणे.

18.1.27 दरवर्षी 31 मार्च रोजी संस्थेच्या स्थावर/जंगम मालमत्तेची मोजदाद करुन घेण्याची व्यवस्था करणे व कमी अधिकांची यादी तयार करुन संचालक मंडळापुढे विचारार्थ ठेवणे.

18.1.28 कार्यकारी संचालकांस संचालक मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय संघाचे दैनंदिन कामकाज सुरळित चालविण्यासाठी रु. 5,000/- रुपये पर्यंत इतकी रक्कम खर्च करता येईल.

18.1.29 **संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक दिनांक 30 सप्टेंबर च्या आत आयोजित करणे मागील आर्थिक वर्षातील व्यवहाराची विवरणपत्रके शासनाकडे/संस्था निबंधकाकडे सादर करण्याची जबाबदारी कार्यकारी संचालक याची आहे.**

18.1.30 **कार्यकारी संचालक संस्था निबंधकाकडे दिनांक 30 सप्टेंबर पुर्वी पुढील माहिती सादर करेल.**

1. **संस्थेच्या कार्याची माहिती देणारे विवरणपत्रक**

2. **लेखापरिक्षण अहवाल**

3. **नफा वाटणी.**

4. **उपविधिदुरुस्ती (असल्यास)**

5. **वार्षिक सभेची तारीख/निवडणूकीबाबतची माहिती.**

6. **लेखापरिक्षकाची नेमणुक व त्याची संमती.**

**7. निबंधकाने कायदा/नियम/उपविधीला अनुसरुन विचारलेल्या माहिती संदर्भात अहवाल सादर करणे.**

**8. कायदा कलम 24 (अ) नुसार सभासद/ संचालक प्रशिक्षणाबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करणे.**

**9. क्रियाशिल सभासदाच्या नोंदवही प्रतिवर्षी तयार करुन त्यास प्रसिध्दी देणे आवश्यक**

**राहील.**

## 19.0 **व्यापार:**

19.1 संघ आवश्यक असल्यास सभासद संस्थांना मालजिनसांचा ठराविक पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र करार करावयास लावून त्याप्रमाणे संस्था कराराच्या अटी पाळतील याकडे लक्ष देईल. एखाद्या संस्थेने हेतुपुरस्सर किंवा निष्काळजीपणामुळे कराराचा भंग केल्यास व त्यामुळे तोटा आल्यास तो सदर संस्थेला भरुन द्यावा लागेल.

## 20.नफयाची **विभागणी:**

नफयाची विभागणी सर्वसाधारण सभेच्या मंजुरीने महाराष्ट्र सहकारी कायदा नियम व पोटनियमातील तरतुदीस पात्र राहून खालीलप्रमाणे करण्यात येईल.

20.1 **अधिमंडळाची वार्षीक बैठकीच्या** वेळी अगोदरच्या आर्थिक वर्षात मिळविलेला व्यापारी नफा जाहीर करण्यात येईल व त्यात खालीलप्रमाणे रक्कमा वजा केल्या जातील.

२०.१.१ सर्व प्रकारचे देय व्याज.

२०.१.२ कामकाजावरील खर्च.

20.1.3 घसारा.

२०.१.४ जमीन सारा, इतर सारे व भाडे.

२०.१.५ नियमानुसार कर्मचा-यांचा प्रॉव्हिडंड फंडामध्ये संघाने द्यावयाचा भाग.

२०.१.६ कर्मचा-यांच्या ग्रॅच्युईटी व बोनसची तरतुद.

२०.१.७ आयकर आणि विक्रीकर यांची तरतुद.

२०.१.८ संशयित/बुडित कर्जाबाबत वा इतर येणे, संशयित वा बुडित रक्कमाबाबत आवश्यक ती तरतुद.

२०.१.९ महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचा कायदा 1960 कलम 64,65 व महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचे नियम 1961 कलम 51 यात नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रकारच्या तरतुदी.

२०.१.१०वरील खर्च वजा जाता उरलेला निव्वळ नफा खालीलप्रमाणे विभागला जाईल.

२०.१.११२५% रिझर्व्ह फंड (गंगाजळी) म्हणून.

२०.१.१२विक्री झालेल्या भाग भांडवलावर सहकारी कायद्याच्या तरतुदीपेक्षा जास्त नाही एवढा (डिव्हिडंड) लाभांश.

२०.१.१३सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षण निधी उभारणे.

२०.२ त्यानंतर उरलेल्या नफयाची वाटणी खालीलप्रमाणे होईल.

२०.२.१ ६०% रक्कम संस्था सभासदांना संघामार्फत विकलेल्या दूधाच्या किंमतीच्या प्रमाणात त्यांना सूट (रिबेट) म्हणून वाटण्यात येईल.

२०.२.२ 5 % धर्मादाय फंड

२०.२.३ 5 % प्रचार फंड

२०.२.४ 5 % दूधाचे धंद्यातील संशोधनाकरिता

२०.२.५ 5 % डिव्हिडंड चढउतार निधी.

२०.२.६ 10 % पशुसुधारणा फंड.

२०.२.७ 10 % इमारत निधी.

२०.३ निबंधकाच्या पूर्वपरवानगीशिवाय या पोटनियमात नमूद केलेल्या नफा विभागणीत फेरबदल करता येणार नाही.

२०.४ **अधिमंडळाची वार्षीक बैठकीत** लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून 6 महिन्यांच्या आत सभासद लाभांश घेऊन गेले नाही तर त्यांच्या संघाकडे असलेल्या अधिकृत पत्त्यावर त्यांच्या खर्चाने मनिऑर्डरने पाठविण्यात येईल. किंवा संघाकडे असलेल्या त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

## 21.0 राखीव निधी आणि सर्वसाधारण राखीव निधी.

21.1 पोटनियम 24.1.1 प्रमाणे होणा-या रक्कमेशिवाय प्रवेश शुल्क जप्त झालेल्या भागाची रक्कम, कर्मचारी सोडून इतरांकडून वसूल केलेल्या दंडाची रक्कम, कर्जावरील दंड, व्याज इ. रक्कम राखीव निधीत जमा होईल. राखीव निधी कायदा व नियमातील तरतुदीनुसार स्वतंत्रपणे गं ुतविली जाईल. मिळालेल्या देणग्या इत्यादी साधारण राखीव निधीत जमा करण्यात येतील. हया निधीचा विनियोग संचालक मंडळाच्या मंजुरीने वेळोवेळी केला जाईल.

21.2 संघाचे हिशोबी वर्षे हे 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

21.3 हिशोबी कामकाजाच्या सोयीप्रमाणे व नियम क्र. 65 मधील तरतुदीस पात्र राहून संघाचे हिशोब व पुस्तके ठेवण्यात येतील.

21.4 संघाचा कोणताही सभासद, संघाशी, त्यांच्याशी झालेल्या व्यवहाराबाबतचे दप्तर संघाच्या कार्यालयीन वेळेत पाहू शकेल.

21.5 मिळकत व येणी आणि जबाबदा-या व देणे त्याचप्रमाणे गेल्या आर्थिक वर्षातील नफा तोटा या संबंधीची पत्रके सहकारी वर्ष संपल्यानंतर 45 दिवसांचे आत तयार करण्यात येतील. या पत्रकाची एक नक्कल सहकारी संस्थांच्या हिशोब तपासणीसाकडे व नोंदणी अधिका-यांकडे पाठविण्यात येईल.

22.0 संलग्न संस्थांच्या पोटनियमात तरतुदीचा अभाव व चुका असल्यास किंवा कमतरता असल्यास सहकारी कायदा व नियम यास अधिन राहून संघाचे पोटनियम त्यांना अधिकृतरित्या लागू होतील.

23.0 शासकीय भागभांडवल घेतले असल्यास परतफेड निधी उभारावा लागेल. संघाचे दरसाल आवश्यक ती रक्कम परतफेड निधीत वर्ग केली पाहिजे. वरील रकमेचा विनियोग संस्थेच्या कामकाजात न करता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा निबंधकाच्या परवानगीने राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीत गंुतवावी.

24.0 सर्वसाधारण सभेत हजर असलेल्या प्रतिनिधींच्या दोन तृतीयांश इतक्या बहुमतानेच या पोटनियममध्ये बदल होऊ शकेल. ते रद्द केले जाऊ शकतील किंवा नवीन पोटनियम स्वीकारले जातील. परंतु सर्वसाधारण सभा बोलविण्याच्या पूर्वसूचनेत पोटनियमात बदल करणे, ते रद्द करणे किंवा पोटनियम स्वीकारणे या संबंधीचा उल्लेख असला पाहिजे. निबंधक, सहकारी संस्था यांनी मंजूर करुन नोंदविल्याशिवाय पोटनियमातील फेरबदल अंमलात येणार नाहीत.

25.0 नोटीस लागू होणे:

पोटनियमास अनुसरुन जेव्हा एखाद्या सभासदास नोटीस द्यावयाची असेल किंवा तो त्याच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या अगर संघाच्या कार्यालयामध्ये जो पत्ता असेल त्या पत्त्यावर पाठविल्यानंतर ती योग्य रितीने बजावली गेली आहे असे समजण्यात येईल.

26.0 अपिल:

संचालक मंडळाच्या निर्णयावर सर्वसाधारण सभेकडे अपिल करता येईल. संचालक मंडळाने आपला निर्णय कळविलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत अपिल सर्वसाधारण सभेपुढे मांडण्यासाठी संघाकडे केलेले नसल्यास सर्वसाधारणसभा अशा अपिलाचा विचार करणेबाबत नकार देईल.

27.0 या पोटनियमात काहीही नमुद केले असले तरी यातील तरतुदी महाराष्ट्र सहकारी कायदा व नियमातील तरतुदीस अनुसरुन नसतील तर कायदा व नियमातील तरतुदी अंतिमत: ग्राहय धरण्यात येतील.

## 28. सभासदाचे प्रशिक्षण

**सहकारी संस्थाच्या सभासदाचे सहकार कायदा विषयक आणि संस्थेच्या व्यवहारासंबंधी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. कायदा कलम 24 (अ) मध्ये नमुद केल्याप्रमाणे विहीत कालावधीत संस्था संचालक व सभासदांचे सहकार कायदा व संस्थेच्या व्यवहारासंबंधीचे प्रशिक्षण पूर्ण होईल. याची जबाबदारी संस्था संचालक व व्यवस्थापक याची राहील. सदर प्रशिक्षणाकरिता संस्था, राज्यशिखर संस्था/राज्यसहकारी संस्थेकडे शासनाने ठरविलेल्या दराने निधी जमा करेल**

**संस्था, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, राज्य संघीय संस्थांमार्फत किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थामार्फत आपले सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकरिता सहकार शिक्षण व प्रशिक्षण आयोजित करील. अशा शिक्षणामुळे व प्रशिक्षणामुळे**

**(एक) संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये सदस्यांचा प्रभावी व सक्रीय सहभाग सुनिश्चित होईल.**

**(दोन) नेतृत्व कार्यासाठी बुध्दिवान कर्मचारी शिकून कुशल बनतील.**

**(तीन) सहकार शिक्षण व प्रशिक्षण यांमुळे व्यावसायिक कौशल्य विकसित होईल.**

**निवडून आलेला किंवा स्वीकृत केलेला समितीचा प्रत्येक सदस्य, विहित करण्यात येईल, असे सहकार शिक्षण व प्रशिक्षण, घेईल.**

## 29. तक्रार निवारण समिती-

**संस्थेच्या सभासदांमधील तसेच सभासद व संस्थेमधील वाद, तक्रारी सोडविण्यासाठी संस्था स्तरावर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये तक्रार निवारण समितीची नेमणुक करण्यात येईल.**

**तक्रार निवारण समितीची रचना खालीलप्रमाणे असेल-**

२९.१ **सदर समिती त्रिसदस्यीय राहील (क्रियाशिल सभासदांमधुन) यातील एक व्यक्तीही अध्यक्ष व अन्य दोन व्यक्ती समितीचे सदस्य म्हणून काम करतील.**

**समितीचे अध्यक्ष हे संस्थेचे वरिष्ठ सभासद व संस्थेच्या कामकाजाचे ज्ञान असलेले असावे. तसेच समितीचे उर्वरित दोन सदस्य हे सहकारातले तज्ञ असावेत किंवा जिल्हा संघाच्या कामकाजाबाबत अनुभवी सभासद असावा.**

२९.२ **संस्थेचा एक वरीष्ठ अधिकारी/सचिव, समितीचा सदस्य सचिव म्हणून काम पाहील व समितीच्या कामकाजाची नोंद ठेवण्याचे काम तो करेल.**

**समितीचा कालावधी नियुक्तीपासून 1 वर्षाचा अथवा पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत राहील.**

**कार्यव्याप्ती:- समिती संस्थेच्या सभासदांमधील किंवा सभासद व संस्थेमधील व्यवसायासंदर्भात व व्यवस्थापना संदर्भातील वाद किंवा तक्रारी यांचे निवारण करेल. प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबधितास सुनावणी देऊन व संबधितांचे म्हणणे ऐकून घेऊन तीन महिन्यांच्या आत तक्रारींचे निराकरण करणे आवश्यक राहील. सदर समितीची कर्तव्य म्हणजे त्यांच्यासमोर आलेल्या वादामध्ये संस्थेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा/नियम, संस्थेचे उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच संस्था आणि सहकार क्षेत्रातील रुढी यांचा विचार करुन सभासदत्व संस्था यांचेमध्ये तडजोड घडवून आणणे. सदर समितीचे इतिवृत्तास संचालक मंडळ सभेस मान्यता घेणे आवश्यक राहील. संचालक मंडळ समितीच्या मान्यतेनंतरच या समितीच्या निर्णयावर अंतिम कार्यवाही होईल.**

## 30. उपविधी लागू होणे-

**संस्था यापूर्वीच नोंदली असल्यास हे उपविधी मंजूर होवून आल्यानंतर या पूर्वीचे अंमलात असलेले सर्व उपविधी रद्द झालेत असे समजले जाईल.**

| अ.क्र. | समिती सभासदांची/प्रवर्तकांची नावे | सही. |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |
| 5. | | |
| 6. | | |
| 7. | | |
| 8. | | |
| 9. | | |
| 10. | | |
| 11. | | |
| 12. | | |
| 13. | | |
| 14. | | |
| 15. | | |